| | |
|---|---|
| | **दिघी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड**<br>**वडमुखवाडी ता हवेली जि पुणे.** |
| **प्रेसनोट** | **दिनांक. १२/०२/२०२४** |

**ऑनलाईन लोनचे घेतलेले पैसे परत करण्यासाठी स्वतःचे खंडणीसाठी दिघी परीसरातुन अपहरण झाल्याचा नियत्रंण कक्षास खोटा कॉल केलेल्या इसमास एक तासात खराडी पुणे येथुन ताब्यात घेवून दिघी पोलीस ठाणे तपास पथकाडुन व गुन्हे शाखा युनिट-०३ कडून बनाव उघड करुन त्याचेवर गुन्हा दाखल केलेबाबत...**

---

ता. ०८/०२/२०२४ रोजी नियंत्रण कक्ष पिंपरी चिंचवड येथे कॉल प्राप्त झाला की, इसम नामे **विराज देशपांडे वय २७ वर्षे यास दिघी परिसरातुन सुमारे १८.३० वा. चे सुमारास तीन अज्ञात इसमांनी किडनॅप करुन पळवुन नेले असुन पाच लाख रुपये खंडणी मागत आहे. तसेच पैसे न दिल्यास जिवे ठाणे मारण्याची धमकी दिली आहे.** सदरची माहिती मिळताच मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०३, व मा. पोलीस उप-आयुक्त गुन्हे शाखा यांनी दिघी पोलीस ठाणे तपास पथक व गुन्हे शाखा युनिट-०३ यांना तात्काळ अपहरण झालेल्या इसमाचा तसेच आरोपींचा शोध घेणेबाबत सुचना देवून रवाना केले होते. त्यानंतर कॉल केलेल्या इसमाचा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्याचे मोबाईल नंबरचे तांत्रिक विष्लेशन करुन पोउपनि भदाणे व सपोनि अंभोरे तसेच तपास पथकाने त्याचा शोध घेतला असता तो खराडी पुणे येथे मिळुन आला त्यास चौकशीकामी ताब्यात घेवुन त्याने त्याचे नाव विराज विकास देशपांडे, वय २६ वर्षे, धंदा नोकरी रा. १०१, माउली अपार्टमेंट वाघोली लोहगाव रोडहॅाटेल रॉयल्स लॉजीक हॉटेलजवळ, वाघोली असे सांगितले त्याचेकडे सदर घटनेबाबात चौकशी केली असता त्याने सुरवातीला उडवाडवीची उत्तरे दिली. तसेच त्याला कोठुन किडनॅप केले अशी विचारणा केली असता त्याने प्रत्येक वेळी वेगवेगळी माहिती दिली त्यास घटनास्थळावर नेले असता त्याने उपयुक्त माहिती दिली नाही. त्यानंतर त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने सांगितले कि "मी इन्टंट कॅश लोन या ॲपवरुन लोन घेतले तसेच लोन कंपणीचे लोक लोन साठी वारंवार फोन करुन लोनचे पैसे परत देण्यासाठी विचारणा करत होते परंतु त्यांचेकडे पैसे नसल्याने विराज देशपांडे व त्याचा मित्र राहुल कुमार हे विमाननगर येथे असताना त्यांनी घरच्यांकडुन लोनचे पैसे भरण्यासाठी खोटा कॉल करण्याचे ठरवले व विराज देशपांडे व राहुल कुमार यांनी पैशाची मागणी करण्यासाठी त्यांची बहिण नामे वृंदा हिरळकर यांना फोन करुन त्याचे किडनॅपिंग झाले असुन पाच लाख रुपये मागणी करत असल्याचे सांगितले व पैसे न दिल्यास जिवे मारणार असल्याचे सांगितले होते" अशी माहिती दिली. अपहरण झालेला इसम विराज विकास देशपांडे, वय २६ वर्षे, हा सुरक्षीत असुन त्याचे कोणत्याही प्रकारचे अपहरण झाले नसुन त्याने पोलीसांना खोटी माहिती दिल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने. त्याचेविरूध्द दिघी पोलीस ठाणे याठिकाणी अदखलपात्र गु. रजि नं. १९३/२०२४ भा. द. वि कलम १८२ अन्वये तक्रार नोंद करण्यात आली असुन पुढील तपासाची मा. न्यायालयाची परवानगी घेण्यात आली असुन पुढील तपास चालू आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप-अयुक्त सो, परीमंडळ ०३, श्री. शिवाजी पवार सो, मा. पोलीस उप-आयुक्त सो, गुन्हे शाखा श्री. संदिप डोईफोडे तसेच मा. सहा पोलीस आयुक्त सो चाकण विभाग, श्री. राजेंद्रसिह गौर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट-०३ शैलेश गायकवाड व सहा. पोलीस निरीक्षक नितीन अंभोरे, प्रभारी निरीक्षक दिघी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-०३ पोलीस उपनिरीक्षक सुनिल भदाणे, पोशि २००१ नांगरे, पो. शि २२९६ जैनक दिघी पोलीस ठाण्याचे तपास पथकातील पोहा ७१३ चिंतामण फलके, पोहा ८०१ प्रदीप पोटे, पोहा १०२० किशोर कांबळे, पोशि ३५५३ उमेश कसबे यांनी केली आहे.

**नागरीकांना याद्वारे आवाहन करण्यात येते कि, नियंयण कक्षास कुणीही खोटी माहिती देवुन पोलीसांचा वेठीस धरु नये अन्यथा कायदेशिर कारवाई करण्यात येईल**

(नितीन अंभोरे)
सहा. पोलीस निरीक्षक
दिघी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड

Scanned with OKEN Scanner